**अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ दि. ०५/०८/२०११ पासुन राज्यात लागु**

# [Food Safety & Standards Act 2006 will be implemented in State of Maharashtra from 05th August २०११]

देशात अन्न विषयक अनेक कायदे/आदेश, विभाग, मंत्रालये कार्यरत होते त्यामुळे अन्न व्यवसायिक संभ्रम अवस्थेत तर ग्राहक अनभिज्ञ होता. जागतिकीकरण, विज्ञानाची प्रगती यामुळे अन्न उत्पादनात अंतरराष्ट्रीय आमुलाग्र बदल झाले होते. हया परीस्थितीचा साकल्याने विचार करुन केंद्र शासनाने सर्वंकष असा एकमेव अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ हा २३ ऑगस्ट २००६ रोजी पारित केला. अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ हा विज्ञाननिष्ठ, जागतिककरणानुसार (Globalisation) एकरेषिय व एकछत्री असे वैशिष्ठे असणारा आहे. या खेरीज कालबध्द अंमलबजावणी, संपूर्ण राज्यात एकसमान परवाना व नोंदणी पध्दत, संशयित अन्न पदार्थ परत बोलाविणे, अन्न सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली अंमलबजावणी, GMP/HACCP ही स्वच्छतेचे निकष अंतर्भूत करुन केवळ तुरुंगवासाची शिक्षा न ठेवता छोटया गुन्हयांसाठी द्रव्यदंडाची तरतुद, ग्राहकांना अन्न सेवनामुळे झालेल्या इजेसाठी भरपाईची तरतूद अशी महत्वाकांक्षी कलमे व नियम अंतर्भूत करुन अदयावत कायदा केला आहे.

कायदयात कलमांबरोबर, अन्न सुरक्षा व मानदे नियमन २०१० अधिसूचना दि. १ ऑगस्ट २०११ नुसार तर अन्न सुरक्षा व मानदे नियम २०११ अधिसूचना क्रमांक G.S.R. 362 (E) दि. ०५ मे २०११ पासून या कायदयाची अंमलबजावणी देशाबरोबरच राज्यात होत आहे.

महाराष्ट्र राज्य या नव्या बदलास गेल्या दोन वर्षापासून कार्यरत होता. आजमितीस राज्याची पूर्ण यंत्रणा दि. ०५/०८/२०११ पासून अन्न सुरक्षा कायदा लागू करण्यास तयार असून त्यादृष्टीने सर्व अधिसूचना, आदेश केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्व व आदेशानुसार जारी करण्यात आलेले आहेत. राज्यात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त यांना राज्य अन्न सुरक्षा आयुक्त म्हणुन अधिसूचित केले असून अन्न सुरक्षा व मानदे कायदयाची अंमलबजावणी अन्न व औषध प्रशासनामार्फत करण्यात येणार आहे. अन्न सुरक्षा अधिकारी, पदावधित अधिकारी (Designated Officer) तडजोड अधिकारी (Adjudicating Officer) तसेच अन्न सुरक्षा लवाद यांच्या नेमणुकीच्या अधिसूचना प्रसिध्द करण्यात येत आहेत.

गेल्या वर्षभरात अन्न व्यवसायिक, अंमलबजावणी यंत्रणा यांच्या प्राथमिक ओळख प्रशिक्षणाची कार्यशाळा घेवुन जनजागृतीचे कार्य पार पाडण्यात आले आहे, परवाना पध्दतीसाठी जसे केंद्रीय परवाना, राज्य परवाना व नोंदणीसाठी यंत्रणा सक्षम करण्यात आली आहे.

ग्राहकाला सुरक्षित अन्न देण्यासाठी व अन्न सुरक्षा व मानदे कायदयाच्या ध्येय धोरणात्मक अंमलबजावणीस राज्य शासन कटिबध्द असून त्याची अंमलबजावणी ०५ ऑगस्ट, २०११ पासून शासन करीत आहे.